सत्यमेव जयते

महाराष्ट शासन

डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपूरी,नांदेड

माहिती अधिकार अधिनियम-२००५

मधील कलम ४(१)(२) मधील तरतुदीनुसार

१७ बाबींवरील (मॅन्युअल)माहिती

(ऑक्टोबर - २०२०)

माहिती अधिकार अधिनियम २००५

अ.क्र	अधिका–याचे नांव	पदनाम
१	डॉ.सुधीर देशमुख,	अधिष्ठाता, डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महा.नांदेड
२	डॉ.वाय.एच.चव्हाण	वैद्यकीय अधिक्षक डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महा.व रुग्णालय नांदेड

अधिष्ठाता
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महा
विष्णुपूरी,नांदेड

माहिती अधिकार अधिनियम २००५

कलम २ एच नमुना (अ)

माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये विभागवार लोकप्राधिकारी यांची यादी.

विभागाचे नाव - वैधकीय शिक्षण व संशोधन ,मुंबई.

कलम २ha/b/c/d

अ.क्रं	लोकप्राधिकारी संस्था	संस्था प्रमुखाचे पद नाव	पत्ता
०१	डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपूरी,नांदेड	अधिष्ठाता	विष्णुपूरी,ता.जि.नांदेड पिन कोड - ४३१६०६

अधिष्ठाता
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महा
विष्णुपूरी,नांदेड

माहिती अधिकार अधिनियम २००५

कलम – २ एच तक्ता (ब)

शासनाकडून पुरेसा निधी प्राप्ता लोकप्राधिकारी संस्थाची यादी.

विभागाचे नाव – वैधकीय शिक्षण व संशोधन ,मुंबई.

कलम २ (h)(i)(ii) अंतर्गत

अ.क्रं	लोकप्राधिकारी संस्था नाव	संस्था प्रमुखाचे पदनाम	ठिकाण व पत्ता
----	संबधित नाही	संबधित नाही	----

अधिष्ठाता

डॉ.शं.च.शा.वै.महाविद्यालय विष्णुपरी,नांदेड

कलम-४ (१) (b) (i)

नांदेड येथील डॉ.शं.च.शा.वै.महाविद्यालय या कार्यालयातील कार्य व कर्तव्य यांचा तपशील

कार्यालयाचे नाव – अधिष्ठाता, .शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपूरी,नांदेड

पत्ता – अधिष्ठाता, .शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपूरी,नांदेड कार्यालय प्रामुख – अधिष्ठाता

शासकिय विभागाचे नाव – वैधकीय शिक्षण व संशोधन ,मुंबई.

कोणत्या मंत्रालयातील खात्यातील अधिनस्ता– वैधकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग मंत्रालय मुंबई.

कार्यक्षेत्र पुणे व स्थानिक क्षेत्र – नांदेड

वैशिष्टये – मंत्रालयीन विभागाशी संबधित

विभागाचे ध्येय व धोरण – सर्व रुग्णावर उपचार व पदवी व पदव्युत्तर वैधकीय शिक्षण
प्रतिबंधात्मक रुग्णसेवा व त्याचे शिक्षण
उपचारात्मक रुग्णसेवा व त्याचे शिक्षण

संबधित कर्मचारी – सोबत जोडले

कार्य – सोबत जोडले आहे.

कामाचे विस्तृ स्वरुप – सोबत जोडले आहे.

मालमत्तेचा तपशिल – एकूण क्षेत्रफळ -अंदाजे (१२०) एकर

मुलांचे व मुलींचे वसतीगृह–

सेवा उपलब्ध :- औषधवैद्यकशास्त्र,

१) शल्यचिकित्साशास्त्र,

अस्थिव्यंगोपचारशास्त्र

स्त्री रोग व प्रसुतीशास्त्र

बधिरिकरणशास्त्र

नेत्रशास्त्र

बालरोगचिकित्साशास्त्र

कान नाक घसा शास्त्र

त्वचा व गुप्तारोगशास्त्र

क्षय व उरोरोगशास्त्र,या विभागांच्या सेवा

२) हृदयशास्त्रक्रियाशास्त्र

हृदयरोगशास्त्र

३) औष्द्य वैद्यक अति दक्षता विभाग,

हदयरोगशास्त्र अति दक्षता विभाग रुग्णासेवा

४) न्यायवैद्यक शास्त्र विभाग

सामाजिक आरोग्या व रोग प्रातिबंधकशास्त्र विभागा मार्फत राष्टीय कार्यक्रम(उदिदष्ट निहाय) व त्यांचे प्राशिक्षण

५) ग्रामिण भागात रोग निदान व उपचार शिबीरे

१)	संस्थेच्या संरचनात्माक तक्त्यामध्ये प्रात्येक स्तारावरचे तपशील	:-	सोबत माहिती दिली आहे
२)	कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक व वेळा	:-	दुरध्वनी क्रमांक- ०२४६२-२३५७१२-१३ कार्यालयाची वेळ- १०.०० ते ०५.४५
	साप्ताहिक सुट्टी व विशिष्टा	:-	दर रविवारी साप्ताहिक सुट्टी आणि शासनाने मंजूर केलेल्या सुटटया सेवेसाठी ठरविलेल्या वेळा.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
विष्णुपूरी,नांदेड


अधिष्ठाता
प्राध्यापक
मुख्य प्रशासकीय अधिकारी
दंत / अस्थी शल्यचिकित्सक
सहयोगी प्राध्यापक
प्रशासकीय अधिकारी
अधिव्याख्याता
अधिसेविका वर्ग -२ श्रेणी ३
औषध निर्माता वर्ग - २
वैद्यकीय अभि.ग्रंथपाल
कार्यालयीन अधिक्षक/लघूलेखक
सहाय्यक प्राध्यापक
सहा.अधिसेविका वर्ग-२श्रेणी ३
वरिष्ठ औषध निर्माता
सांख्यिकी
वरिष्ठ सहाय्यक
औषध निर्माता
वरिष्ठ लिपीक/लघुटंकलेखक
कनिष्ठ लिपीक व इतर तांत्रिक पदे
पाठयनिर्देशिका
व. शुश्रूषा लेखापाल
परिसेविका
शिपाई
अधिपरिचारीका
विद्यार्थी परिचारीका
गृह-नि-वस्त्रपाल

माहिती अधिकार अधिनियम २००५

अधिकारी आणि कर्मचारी- पदाचा जॉब चार्ट

अधिष्ठाता - यांचा जॉब चार्ट

- रुग्णालय व महाविद्यालयाच्या शिस्तबध्द व प्रभावी प्रशासनावर देखरेख ठेवणे . संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी नियंत्रणा बाबतीत दिलेली जबाबदारी रुग्णालय व महाविद्यालयाच्या प्रशासना पर्यंत पोहचवणे व संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्याशी थेट पत्रव्यवहार करणे. तसेच रुग्णालय व महाविद्यालयाच्या सर्व पत्रव्यवहार करणे.
- रुग्णालय व महाविद्यालयाच्या आर्थिक बाबी तसेच अंदाजपत्रक बनविणे, पुरवठा व खरेदी याबाबतची काम करणे.
- मृत्यूपत्र देणगी व देणगीचा स्विकार अथवा निकाली काढण्याबाबत असणारे प्रश्न संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या कडे पाठविणे.
- रुग्णालय व महाविद्यालय कर्मचारी यांचा विचार करुन महाविद्यालय परिषदेच्या सोईनुसार प्रत्येक सत्रात प्रात्यक्षीत कार्य व अध्यापकांना मार्गदर्शन करणे.
- विद्यार्थ्यांच्या वसतीगृहाचे प्रमुख म्हणून त्याचे शिस्तबध्द व्यवस्थापन व देखभालीची कामे करणे. तसेच सोईकरिता
- वसतीगृहाबाहेर निवासस्थानात राहण्याकरिता परवानगी देणे तसेच प्रत्येक सत्रात त्याची कार्यालयीन तपासणी करणे.
- परिचर्या प्रशिक्षण शाळेचे प्रमुख म्हणून त्याचे शिस्तबध्द व्यवस्थापन व देखभाल करतील.
- रुग्णालय व महाविद्यालय प्रमुख म्हणून आवारातील सर्व उपकरण संचांची देखभाल करणे व सुस्थितीत ठेवणे.
- महाविद्यालय परिषदेच्या बैठकीचे अध्यक्ष असतील तसेच त्यापूर्वी परिषदेच्या सोईनुसार कोणताही प्रश्न अथवा विषय निर्धारीत नियमानुसार सोडविणे.
- विद्यार्थ्यांच्या परिक्षेकरिता आव श्यक सर्व प्रकारच्या प्रमाणपत्रावर स्वाक्षरी करतील तसेच संबंधीत सर्व सुचना, आदेशाबाबत अध्यापकांना मार्गदर्शन करणे.
- रुग्णालय व महाविद्यालयातील जड संग्रह, पाकशाळा, वस्त्रविभाग, औषध भांडार, यंत्रसामुग्री, ग्रंथालय व इतर साठा यांचे परीक्षण करतील. वस्त्र, यंत्रसामुग्री व इतर वस्तू यांची ठराविक काळाने निर्लेखन करुन त्यांचा जड संग्रह कमी करणे.
- रुग्णालयाच्या अभ्यागत मंडळाचे सचिव राहतील.
- रुग्णालय व महाविद्यालयातील विविध समित्या स्थापन करणे.

माहिती अधिकार अधिनियम २००५

अधिकारी आणि कर्मचारी- पदाचा जॉब चार्ट

प्राध्यापक - यांचा जॉब चार्ट

या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय प्राध्यापकांची एकूण २१ पदे मंजूर असून ती पुढील विषयांकरीता मंजूर आहेत.

१) शरीररचना २) शरीरक्रिया ३) जीवरसायन ४) शरीरविकृती ५) सूक्ष्मजीशास्त्र ६) औषधशास्त्र ७) न्यायवैद्यक ८) पी.एस.एम

९) औषधवैद्यक १०) बालरोग ११) क्षयरोगचिकित्सा १२) त्वचा व गुप्तरोग १३) मानसोपचार १४) शल्यचिकित्सा

१५) कान, नाक व घसा १६) नेत्रशल्यचिकित्सा १७) अस्थिव्यंगोपचार १८) स्त्रीरोग व प्रसुती १९) बधिरीकरण

२०) क्ष- किरणशास्त्र २१) दंतशल्यचिकित्सा

- विभागातील प्राध्यापक आपआपल्या विषयात निपुर्ण असून त्यांनी विद्यार्थ्यांना त्या विषयाचे अध्यापन करणे, त्या विषयाचे प्रात्याक्षिकांचे कार्यक्रम तयार करुन ते यशस्वीरित्या पूर्ण करणे.
- आवश्यकता असेल तेंव्हा त्यांनी तातडीच्या वेळी रुग्णसेवा देणे.
- विभागातील इतर सहयोगी प्राध्यापक, अधिव्याख्याते व इतर सर्व कर्मचारी विद्यार्थ्यांचे इतर शैक्षणिक कार्यक्रम व्यवस्थित पूर्ण करतात किंवा कसे यावर प्राध्यापक व विभागप्रमुख नियंत्रण ठेवणे.
- त्यांना करावे लागणारे पत्रव्यवहाराची कामे त्वरीत करणे.
- जनतेशी सलोख्याचे संबंध ठेवणे.
- आपआपल्या विषयात प्रत्येक विद्यार्थी निपूर्ण होईल या संदर्भात स्वत: काळजीने नावीन्यपूर्ण शैक्षणिक कार्यक्रमाची आखणी करतील व त्या कार्यक्रमांची यशस्वी

माहिती अधिकार अधिनियम २००५

सहयोगी प्राध्यापक - यांचा जॉब चार्ट

या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात सहयोगी प्राध्यापकांची एकूण पदे मंजूर असून ती पुढील विषयांकरीता मंजूर आहेत.

१) शरीररचना २) शरीरक्रिया ३) जीवरसायन ४) शरीरविकृती ५) सूक्ष्मजीशास्त्र ६) औषधशास्त्र ७) न्यायवैद्यक ८) पी.एस.एम ९) औषधवैद्यक १०) बालरोग ११) क्षयरोगचिकित्सा १२) त्वचा व गुप्तरोग १३) मानसोपचार १४) शल्यचिकित्सा १५) कान, नाक व घसा १६) नेत्रशल्यचिकित्सा १७) अस्थिव्यंगोपचार १८) स्त्रीरोग व प्रसुती १९) बधिरीकरण २०) क्ष- किरणशास्त्र २१) दंतशल्यचिकित्सा

सहयोगी प्राध्यापक चिकित्सालयीन विभाग

१) औषधवैद्यक २) बालरोग ३) त्वचा व गुप्तरोग ४) मानसोपचार ५) शल्यचिकित्सा ६) अस्थिव्यंगोपचार ७) नेत्रचिकित्सा ८) कान, नाक व घसा ९) स्त्रीरोग व प्रसुती १०) क्ष-किरण ११) बधिरीकरण १२) दंतशल्यचिकित्सा १३) क्षयरोगचिकित्सा अत्याधुनिक तंत्रज्ञानाव्दारे रुग्णांचे चाचणी अहवाल तयार करणे, तसेच पुढील उपचाराची उपाययोजना सूचविणे बिम थेरपी नंतर जास्त गुंतागुंत असल्यास त्याबाबत उपाययोजनो सूचविणे.

१) रुग्णांच्या तपासणीबाबत उपाययोजना करणेबाबत सूचविणे.

२) उपाययोजना बाबत दैनिक तपासणी करणे जसे KV, MA, Filter, etc.

३) उपचाराबाबतची कागदपत्रे नियमित तपासणे.

४) रुग्ण तपासणीच्या नोंदी नियमीत तपासणे व रक्त पेशींच्या बाबतची नियमित तपासणी व प्रयोगशाळेतील चाचण्याच्या तारखा ठरवणे व देणे

माहिती अधिकार अधिनियम २००५

सहाय्यक प्राध्यापक - यांचा जॉब चार्ट

- प्राध्यापक व विभाग प्रमुख यांनी वेळोवेळी ठरवून दिलेली कामे पूर्ण करणे,
- पदवीपूर्व विद्यार्थ्यांना शिकविणे, बाहयारुग्ण व अंतररुग्ण विभागातील रुग्णांची तपासणी करणे,
- शस्त्रक्रिया करणे, त्यांच्या विभागातील रेसिडेंटस, हौसमन व इंटर्नि यांच्याकडून रुग्णांच्य देखभालीचे काम करुन घेणे,
- सेमिनार व प्रॅक्टीकल्स परिक्षेमध्ये मदत करणे.

माहिती अधिकार अधिनियम २००५

मुख्य प्रशासकीय अधिकारी -यांचा जॉब चार्ट

- महाविद्यालयातील प्रशासनिक कार्यालयाचे प्रमुख म्हणून कामकाज पाहणे.
- प्रशासकीय कामकाजाशी संबंधीत टपाल पाहणे.
- तातडीच्या शासकीय पत्रांना(डी.ओ.,टेलीग्राम,एल.ए.क्यु.,कट मोशन व इतर) तात्काळ उत्तर देणे
- पदोन्नतृ,बदली,नियुक्ती, रजा व इतर बाबींचे कामकाज पाहणे.
- विभागीय चौकशी तक्रार व जनतेच्या तक्रारी पाहणे.
- जन संपर्कतेकरिता व्यक्ती अथवा अभ्यागत यांच्याशी संपर्क प्रस्थापित करणे.
- लेखा विभागाने घेतलेल्या लेखा आक्षेपांची पूर्तता व भांडार पडताळणी विभागाच्या पडताळणीची पुर्तता प्रशासकीय विभागाकडून करवून घेतील.
- न्यायालयीन प्रकरणांचा लवकरात लवकर निपटारा करणे.
- वरिष्ठांनी वेळोवेळी सोपविलेल्या विविध प्रकारच्या जबाबदाऱ्या पार पाडणे.
- संस्थेतील अतांत्रीक व दैनदिन पत्रव्यवहाराचा निपटारा करणे.
- अधिष्ठाता/अधिक्षक यांच्या अनुपस्थितीत संस्थेचे काम पाहतील.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
विष्णुपूरी,नांदेड

माहिती अधिकार अधिनियम २००५

प्रशासकीय अधिकारी - यांचा जॉब चार्ट

- रुग्णालतील विविध प्रकारचे प्रशासनिक काम व्यवस्थित पार पाडणे .
- रुग्णालयीन कामकाजाच्या विविध प्रकारच्या अडचणी सोडविणे.
- अधिष्ठातांनी वेळोवेळी सोपविलेल्या विविध प्रकारच्या जबाबदा-या पार पाडणे
- रुग्णालयातील प्रशासकीय कामकाज विविध विभागांद्वारे व्यवस्थित पार पाडण्याची जबाबदारी प्रशासकीय अधिका-यांची येते
- सर्व वर्ग ३ आणि वर्ग ४ कर्मचारी वर्गावर नियंत्रण ठेवणे
- सर्व कर्मचा-यांची हजेरी पुस्तके तपासणे
- सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गांचे वेतन व इतर भत्ते व्यवस्थितरित्या काढण्यात येतात किंवा कसे याबाबत दक्षता बाळगणे
- सर्व अधिकारी व कर्मचा-यांना वेळेवर वेतन अदा करणे
- आहरण व संवितरण अधिकारी म्हणुन जबाबदारी पार पाडणे
- मा.अधिष्ठातांना प्रशासकीय कामकाजात सहाय्य ठेवणे
- विविध प्रकारचे शुल्क जमा करणे त्यांचा हिशोब ठेवणे
- रुग्णालयात जमा होणा-या सर्व रक्कमांचा हिशोर ठेवणे. जमा व खर्चाचे हिशोब सादर करणे
- दरवर्षी रुग्णालयात आवश्यक असणारा निधी शासनाकडुन मागविण्याकरीता प्रस्ताव तयार करणे
- सर्व कर्मचा-यांच्या सेवा अभिलेखांवर नियंत्रण ठेवणे
- रुग्ण शुल्क वसुली करणे, जमा हिशोब यावर नियंत्रण ठेवण

माहिती अधिकार अधिनियम २००५

वर्ग -१ पदाचा जॉब चार्ट

वैद्यकीय अधिक्षक:

- रुग्णालयालयाचे दैनंदिन प्रशासन रुग्णांशी संबधित कामे यावर नियंत्रण ठेवणे.
- निरनिराळया वैद्यकीय तपासण्या करणे व त्यांची प्रमाणपत्रे देणे
- वैद्यकीय प्रतिपूर्तीची देयके तपासणे व प्रमाणित करणे.
- व्ही.व्ही.आय.पी.व्यंक्तींच्या काफिल्यासोबत वैद्यकीय सुविद्या उपलब्ध करुन देणे.
- रुग्णालयीन प्रशासनाशी संबधित कामे पाहणे इत्यादी.

वैद्यकीय उपअधिक्षक:

- वैद्यकीय अधिक्षक यांचे आदेशानुसार उपअद्यिक्षक कार्यरत असतात
- रुग्णालयाचे दैनंदिन काम पाहणे.
- रुग्णांसाठी औषधी शल्याउपकरणे.
- वस्त्र इत्यादी रुग्णोपयोगी साहित्यांचा पुरवठा पाहणे.
- चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांच्या आस्थापनेचे पुर्ण काम पहाणे.

अस्थिव्यंगशल्या चिकीत्सका :

- रुग्णालयात येणा-या बाहय रुग्णांची तपासणी करणे.
- त्यांचेवर योग्य ते उपचार करणे.
- आवश्याक शस्त्रक्रिया करणे.
- अपंग रुग्णांची तपासणी करणे.

प्रपाठक नेफ्रालॉजी :

- किडनी संबधित रुग्णांच्या तपासण्या करणे योग्या ते उपचार करणे.
- आवश्याक तेथे डायलेसीस करणे.
- या विषयाचे प्राशिक्षण विद्याथ्र्यांना देणे.

माहिती अधिकार अधिनियम २००५

वर्ग - २ पदाचा जॉब चार्ट

बधिरीकरण शास्त्रज्ञ :

- रुग्णांना शास्त्रक्रियेदरम्यान रुग्णांना भुल देणे.
- त्यांच्या हृदयाचे ठोके नियंत्रीत ठेवणे.
- रक्तदाब नियंत्रीत ठेवणे.
- रुग्णास आवश्यक असणारे उचार करणे इत्यादी.

सहाय्यक निवासी वैद्यकीय अधिकारी :-

- वैद्यकीय अधिक्षक व उपाअधिक्षक यांनी दिलेल्या कामानुसार तातडीक बाहया रुग्णसेवा विभाग येथे येणाऱ्या रुग्णांची तपासणी करणे.
- योग्य त्या उपचारासाठी संबंधीत विभागाकडे पाठविणे.
- रक्त पेढीतील दैनंदीन काम पहाणे.
- रुग्णालयातील कक्ष, शस्त्रक्रियागृहे यांचे दैनंदिन कामकाजाची पाहणी करणे नियंत्रण ठेवणे.
- महत्वाच्या व अतिमहत्वाच्या व्यक्तीना वैद्यकिय सुविधा पुरविण्याच्या कामात मदत करणे इत्यादी.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
विष्णुपूरी,नांदेड

रक्त संक्रमण अधिकारी :-

- रक्त पेढीतील दैनंदीन काम पाहणे.
- रक्त दात्यांचे रक्त घेणे.
- रक्त संदर्भात करावयाच्या प्रक्रियेवर नियंत्रण ठेवणे.
- रक्तदान शिबीरांचे काम पाहणे इत्यादी.

अपघात विभाग वैद्यकीय अधिकारी :-

- तातडीक बाहयरुग्णसेवा विभाग येथे येणाऱ्या रुग्णांची तपासणी करणे.
- योग्य त्या उपचारासाठी रुग्णांना संबधीत विभागाकडे पाठविणे.

वैद्यकीय अधिकारी :-

- वैद्यकीय अधिक्षक व उपाधिक्षक यांनी दिलेल्या कामानुसार रुग्णालयीतील कक्ष शस्त्रक्रियागृहे यांचे दैनंदिन कामकाजाची पाहणी करणे व नियंत्रण ठेवणे.
- महत्वाच्या व अतिमहत्वाच्या व्यक्तीना वैद्यकीय सुविध पुरविण्याच्या कामात मदत करणे.
- महत्वाच्या व अतिमहत्वाच्या व्यक्तींना वैद्यकीय सुविधा पुरविण्याच्या कामात मदत करणे.
- अपघातग्रस्त रुग्णांवर उपचार करणे.

जिवरसायन शास्त्रज्ञ :-

- जिवरसायन शास्त्र विभागाशी संबधीत रुग्णांच्या रक्त, लघवी यांच्या निरनिराळया तपासण्या करणे.
- तपासण्यांचे अहवाल देणे.

दंत शल्यचिकित्सक :-

- अपघातग्रस्त रुग्णांच्या दातावर निरनिराळया प्रकारच्या शस्त्रक्रिया करणे.

पेशी प्रजन्न वेत्ता (पेशीतज्ञ) : -

- प्रयोगशाळेत निरनिराळया तपासण्या करणे.
- जेनेटिक्स संदर्भातील रुग्णांच्या वैद्यकीय निदानास मदत करणे.
- रंगसूत्रे तपासणे.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
विष्णुपूरी,नांदेड

वैद्यकीय अभिलेख ग्रंथपाल :-

- रुग्णालयातील अंत रुग्णांचे अभिलेखे अद्ययावत ठेवणे.

औषधनिर्माता : -

- रुग्णालयातील बाहयरुग्ण विभाग व अंतर रुग्णांना औषधाचा पुरवठा करणे.
- औषध भांडारावर नियंत्रण ठेवणे.
- औषधांच्या खरेदी संबधातील सर्व कामे करणे.

सांख्यिकी :-

- रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुगणांविषयी सांख्यिकी माहिती तयार करणे.
- अभिलेखे ठेवण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कामे करणे.

अधिसेविका वर्ग २ श्रेणी ३ :-

- रुग्णालयातील परिचारीका, अधिपरिचारीका यांचे कामावर नियंत्रण ठेवणे.
- विद्यार्थी परिचारीका प्रशिक्षण विभागाचे काम पाहाणे.
- परिचारीकांशी संबधीत प्रशासनाचे काम पाहाणे.

अधिसेविका वर्ग २ : -

- अधिसेविका वर्ग २ श्रेणी ३ यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णालयातील परिचारीका, अधिपरिचारीका यांचे कामावर नियंत्रण ठेवणे.

माहिती अधिकार अधिनियम २००५

अधिव्याख्याता/सहाय्यक अधिव्याख्याता यांचा जॉब चार्ट

- आपल्या विभागातील सर्व कर्मचारी आप आपली कामे व्यवस्थित पुर्ण करतात किंवा कसे यावर देखरेख ठेवणे
- आपल्या विभाग प्रमुखांनी वेळीवेळी सांगितलेली विविध प्रकारचे कामे पार पाडणे
- मा. अधिष्ठाता यांनी सोपविलेली इतर शैक्षणिक कार्यक्रम पार पाडणे
- त्यांना करावे लागणारे पत्रव्यवहाराचे काम त्वरीत पुर्ण करणे
- जनतेशी सलोख्याचे संबंध ठेवणे
- आप आपल्या विषयात प्रत्येक विद्यार्थी प्रत्येक विषयात निपुण होईल या संदर्भात स्वत: काही नाविन्यपुर्ण शैक्षणिक कार्यक्रमांची आखणी करतील व त्या कार्यक्रमांची यशस्वीपणे अंमलबजावणी होते आहे किंवा कसे याबाबत दक्ष राहणे
- आपल्या विभागात विविध प्रकारचे शैक्षणिक कार्यक्रम आखणे व ते यशस्वीरित्या पुर्ण करण्यात प्राध्यापक व विभाग प्रमुख व सहयोगी प्राध्यापक यांना सहाय्य करणे
- विविध प्रकारचे राष्ट्रीय कार्यक्रमांची आखणी करण्यात प्राध्यापक व विभाग प्रमुख व सहयोगी प्राध्यापक यांना सहाय्य करणे व ते राष्ट्रीय कार्यक्रम यशस्वीरित्या राबविण्याकामी सहाय्य करणे
- आप आपल्या विभागामध्ये विद्यार्थ्यांकरिता विविध प्रकारच्या प्रात्यक्षिकांचे आयोजन करणे व ते यशस्वीरित्या पार पाडणे. त्या कामामध्ये इतर तांत्रीक कर्मचाऱ्यांचे सहाय्य घेतील. महाविद्यालयात विद्यार्थ्यांकरिता विविध प्रकारच्या शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करतील व सर्व कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडणे.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
विष्णुपूरी,नांदेड

माहिती अधिकार अधिनियम २००५

मानसेवी वर्ग १ व २ – पदांचा जॉब चार्ट

मानसेवी :-

- प्रत्येक मानसेवी वैद्यकिय अधिकारी रुग्णालयातील चिकात्सालयीन कामे करणे. अध्यापनाची कामे करणे.
- शासनाच्या पूर्व संमतीने नेमुन दिलेली अशी इतर कामे करणे

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
विष्णुपूरी,नांदेड

माहिती अधिकार अधिनियम २००५

कार्यालयीन अधिक्षक- पदाचा जॉब चार्ट

- रुग्णालयातील विविध प्रकारचे प्रशासनिक काम व्यावस्थित पार पाडणे.
- अधिष्ठातांनी ,मुख्या प्रशासकीय अधिकारी व प्रशासकीय अधिकारी यांनी वेळोवेळी सोपविलेल्या विविध प्रकारच्या जबाबदा-या पार पाडणे.
- रुग्णालयातील प्रशासकीय कामकाज विविध विभांगाव्दारा व्यावस्थित पार पाडण्याची जबाबदारी कार्यालयीन अधिक्षक यांची येते .
- सर्व वर्ग-३ आणि वर्ग-४ कर्मचारी यांचे सेवा अभिलेख अद्ययावत ठेवणे.
- सर्व कर्मचा-यांच्या वैयक्तिक नस्त्या तयार करुन त्या अद्ययावत ठेवणे.
- सर्व अधिकारी व कर्मचारी वर्गाचे वेतन व इतर भत्ते व्यवस्थित रित्या काढण्यात येतात किंवा कसे याबाबत दक्षता बाळगणे.
- मा.अधिष्ठाता ,मुख्या प्रशासकीय अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी यांनी वेळोवेळी सुचविलेली विविध कामे पार पाडणे.
- कार्यालयातील कर्मचारी वर्गावर नियंत्रण ठेवणे.
- कर्मचा-यांच्या विविध प्रकारच्या अडीअडचणी सोडविणे.
- कर्मचा-यांना त्यांच्या कामकाजात येणा-या अडीअडचणी सोडविण्याकरीता मार्गदर्शन करणे.
- रुग्णालयीन शुल्क व त्या संबंधी नोंदवहया तपासणे.
- आकस्मिक देयके ,पाकगृह विभागात देखरेख व नियंत्रण ठेवणे,यंत्रसामुग्री,किरकोळ वस्तू पुरवठा धुलाई ,वस्त्रविभाग ,सार्वजनिक बांधकामा विष्यक सर्वबाबी हाताळणे इ.विभागावर देखरेख ठेवणे.
- कर्मचा-यांना सोपविण्यात आलेली कामे प्रभावी पणे व उत्तम प्रकारे पार पाडण्याकरीता त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करणे.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपूरी,नांदेड

माहिती अधिकार अधिनियम २००५

वरिष्ठ सहाय्यक - पदाचा जॉब चार्ट

- अधिष्ठातांनी वेळोवेळी सोपविलेल्या विविध प्रकारच्या जबाबदा-या पार पाडणे.
- मा.अधिष्ठाता ,मुख्या प्रशासकीय अधिकारी , प्रशासकीय अधिकारी व कार्यालयीन अधिक्षक यांनी वेळोवेळी सुचविलेली विविध कामे पार पाडणे.
- शाखेतील वरिष्ठ,कनिष्ठ लिपिकांकडून कामे करुन घेणे व कामकाजावर नियंत्रण ठेवणे.
- रोख नोंदवही अद्ययावत ठेवणे.
- स्वीय प्रपंची खाते अद्ययावत ठेवणे तसेच स्वीय प्रपंची रोख नोंदवही अद्ययावत ठेवणे.
- खाते निहाय लेखा परिक्षण व महालेखपाल मुंबई यांचे अनुपालन अहवाल सादर करणे.
- काषागारात देयके टाकणे व बॅकेतून रकमा आणणे.
- चारमाही,आठमाही ,वार्षिक अंदाज पत्रके तयार करणे.
- मासिक खर्चाचे विवरण पत्रे तयार करणे.
- कार्यक्रम अंदाजपत्रक तयार करणे.
- संस्थेतील विविध वस्तू पुरवठा व खरेदी संदर्भात काम करणे.

अधिष्ठाता,

डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपूरी,नांदेड

माहिती अधिकार अधिनियम २००५

प्रयोग शाळा तंत्रज्ञ - पदाचा जॉब चार्ट

- प्रयोगशाळा तंत्राने त्यांच्या कामाच्या ठिकाणी त्यांना ठरवून दिलेल्या शासकीय कामाच्या वेळी कर्तव्यावर हजर राहावे.
- तसेच अपातकालीन प्रसंगी कॉल केल्यावर त्वरीत सेवेस हजर राहावे.
- त्याने दररोज तपासलेल्या रुग्णांची नोंदवही ठेवावी.
- महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यक्रमात अध्यापकांना मदत करणे .
- महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विभागीय विद्यापीठांच्या प्रात्यक्षिक कामांमध्ये अध्यापकांना मदत करणे.
- महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या विभागीय विद्यापीठांच्या प्रात्यक्षिक परीक्षांच्यावेळी अध्यापकांना परीक्षकांना आवश्यक ती मदत करणे .
- प्राध्यापक व विभाग प्रमुखांनी वेळोवेळी सांगितलेली कामे करणे.
- प्रयोगशाळेत विविध प्रकारच्या चाचण्या करुन त्यांच्या नोंदी घेणे, रिपोर्टींग करणे.
- ते उप-विभागीय जडवस्तू नोंदवही अद्ययावत ठेवणे व साप्ताहिक मागणीपत्रे तयार करणे.
- प्रयोग शाळेतील साधनसामुग्रीचे परिरक्षण व दुरुस्ती यांसाठी योग्य ती कार्यवाही करणे.
- सकाळभ काम सुरु करण्यासाठी लागणारी सर्व पूर्व तयारी आदल्या दिवशी सध्याकाळी पूर्ण झाली आहे, याबददल त्याने खात्री करुन घ्यावी.
- राष्ट्रीय कार्यक्रमात मदत व सहभाग घेणे.
- प्राध्यापक व वरीष्ठांनी वेळोवेळी सांगीतलेली कामे करणे.

अधिष्ठाता,

डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महा

विष्णुपूरी,नांदेड

माहिती अधिकार अधिनियम २००५

प्रयोग शाळा सहाय्यक - पदाचा जॉब चार्ट

- प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांना कामात व संबंधीत विभागात दैनंदिन कामात मदत करणे.
- प्रयोगशाळांची स्वच्छता व देखभाल करणे.
- प्रयोगशाळेमध्ये लागणाया साहित्य भांडारातून मागणी प्रमाणे घेवून येणे.
- अहवाल तयार करण्यासाठी प्रयोगशाळा तंत्रज्ञांनी मदत करणे.
- रुग्ण शुल्क वसुल करणे, जमा करणे व हिशोब ठेवणे.
- विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यक्रमांत अध्यापकांना मदत करणे.
- विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक कामांमध्ये अध्यापकांना मदत करणे.
- विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परिक्षांच्यावेळी अध्यापकांना परीक्षकांना आवश्यक ती मदत करणे.
- प्राध्यापक व विभाग प्रमुखांनी वेळोवेळी सांगितलेली कामे करणे.
- प्रयोगशाळात विविध प्रकारच्या चाचण्या करुन त्यांच्या नोंदी घेणे, रिपोर्टींग करणे.
- राष्ट्रीय कार्यक्रमात मदत व सहभाग घेणे.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महा विष्णुपूरी,नांदेड

माहिती अधिकार अधिनियम – २००५

वरिष्ठ लिपीक – पदाचा जॉब चार्ट

- सर्व प्रकारची देयके तयार करणे.
- रोख नोंदवही अद्ययावत करणे.
- स्वीय प्रपंची खाते अद्ययावत ठेवणे तसेच स्वीय प्रपंची रोख नोंदवही अद्ययावत ठेवणे.
- खातेनिहाय लेखा परिक्षण व महालेखापाल मुंबई यांचे अनुपालन अहवाल सादर करणे.
- भविष्य निर्वाह निधी लेखे अद्ययावत ठेवणे.
- मासिक खर्चाचे विवरण पत्रे तयार करणे.
- कार्यक्रम अंदाजपत्रक तयार करणे.
- कार्यालयीन अधिक्षकांनी सांगितलेली कामे करणे.
- मुख्य प्रशासकीय अधिकारी, प्रशासकीय अधिकारी यांनी सोपविलेली कामे पार पाडणे.
- कर्मचा्रयांची सेवा अभिलेखे अद्ययावत तयार करणे.
- अधिका्रयांची व कर्मचा्रयांची सेवा पुस्तके तयार करुन अद्ययावत ठेवणे.
- अधिकारी व कर्मचा्रया वैयक्ती नस्त्या तयार करुन अद्यावत ठेवणे.
- वरिष्ठांनी वेळोवेळी सोपविलेली कामे पार पाडणे.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महा
विष्णुपूरी,नांदेड

माहिती अधिकार अधिनियम - २००५

कनिष्ठ लिपीक - पदाचा जॉब चार्ट

- सर्व प्रकारची देयके तयार करणे.
- आकस्मिक खर्चाची नोंदवही ठेवणे.
- मुळ सेवा पुस्तके अद्ययावत ठेवणे व नोंदी घेणे.
- आवक जावक करणे.
- आस्थापना विभागाशी असलेला पत्रव्यवहार करणे.
- नियतकालिन विवरणपत्रे तयार करणे.
- विधानसभा तारांकित प्रश्नांची उत्तरे टंकलिखीत करणे.
- बैठकांविषयी माहिती तयार करणे.
- गोपनिय व अर्धशासकीय पत्रांच्या नोंदवहया अद्ययावत ठेवणे.
- निवृत्तीवेतनाची सर्व कागदपत्रे तयार करणे.
- किरकोळ रजेचा हिशोब ठेवणे.
- पोष्टांच्या तिकीटांचा हिशोब ठेवणे(अ व ब नोंदवहया अद्ययावत ठेवणे.
- वैद्यकिय तपासण्या प्रमाणपत्रे तयार करणे व वैद्यकीय अधिकाृयांच्या स्वाक्ष-या घेणे.
- अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करणे.
- मासिक खर्च विवरणपत्र तयार करणे.
- बिल रजिस्टर, चेक रजिस्टर, टोकन रजिस्टर अद्ययावत ठेवणे.
- मासिक कोरीअर रिपोर्ट तयार करणे.
- वेळोवेळी वरिष्ठांनी सोपविलेली विविध कामे पार पाडणे.
- कार्यालयीन अधिक्षक सांगितलेली कामे करणे.
- मुख्य प्रशासकीय अधिकारी, प्रशासकीय अधिकरी यांनी सोपविलेली कामे पार पाडणे.
- विविध प्रकारच्या नस्त्या अभिलेख विभागात क्रमाने लावून ठेवणे

माहिती अधिकार अधिनियम २००५

क्ष- किरण तंत्रज्ञ - पदाचा जॉब चार्ट

- क्ष- किरण तंत्रज्ञाने २४ तास हजर रहावे.निकडीच्या वेळेस आवश्यक असेल त्याप्रमाणे त्याने हजर रहावे.
- त्याने दररोज नेहमीचे काम सुरु करण्यापूर्वी क्ष- किरण यंत्र स्वच्छा करावे व ते नीट काम देत आहे हे पाहावे.
- त्याच्या ताब्यातील क्ष-किरण यंत्राच्या परिरक्षणासाठी व दुरुस्तीसाठी तो जबाबदार असतो.
- त्याने यंत्राचे संधारण व दुरुस्त्या याची नोंद दिनांकासह दर्शवणारी विशेष नोंदवही ठेवावी.
- क्ष-किरण विभागाची उप-विभागीय जडवस्तू नोंदवही व साप्ताहिक मागणीपत्रे यासाठी तो जबाबदार असतो.
- त्याने वापरलेल्या क्ष-किरण फिल्मचा दररोजचा हिशोब त्यांच्या निरनिराळया आकारानुसार ठेवावा.
- क्ष-किरण यंत्राच्या कामकाजात कोणताही अडथळा येत असल्यास त्यान तो वेळेवर क्ष-किरण विभाग प्रमुखांच्या निदर्शनास आणावा.
- विकिरणाचा धोका टाळण्यासाठी असलेली सर्व साधनसामग्री सुस्थितीत आहे याकडे त्यान लक्ष्ा ठेवावे.
- राष्टीय कार्यक्रमात मदत व सहभाग घेणे.
- प्राध्यापक व विभाग प्रमुखांनी वेळोवेळी सांगीतलेली कामे करणे.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपूरी,नांदेड

माहिती अधिकार अधिनियम २००५

अंधारखोली सहाय्यक - पदाचा जॉब चार्ट

- अंधारखोली सहाय्यकाने शासनाने ठरवून दिलेल्या वेळात हजर रहावे.निकडीच्या वेळेस आवश्यक असेल त्याप्रमाणे त्याने हजर रहावे.
- क्ष◌ा किरण तंत्रज्ञाने काढलेल्या क्ष◌ा किरणांना रसानात धुणे व वाळवणे.
- क्ष◌ा किरण तंत्रज्ञाला रुग्णाचा क्ष◌ा किरण काढण्यात मदत करणे.
- प्राध्यापक व विभाग प्रमुखांनी वेळोवेळी सोपविलेली कामे पार पाडणे.
- त्याने दररोज नेहमीचे काम सुरु करण्यापूर्वी क्ष◌ा किरण यंत्र स्वच्छ करावे व ते नीट काम देत आहे हे पाहावे.
- त्याने यंत्राचे संधारण व दुरुस्त्या याची नोंद दिनांकासह दर्शवणारी विशेष नोंदवही ठेवावी.
- त्याने वापरलेल्या क्ष-किरण फिल्मचा दररोजचा हिशोब त्यांच्या निरनिराळया आकारानुसार ठेवावा.
- क्ष-किरण यंत्राच्या कामकाजात कोणताही अडथळा येत असल्यास त्यान तो वेळेवर क्ष-किरण विभाग प्रमुखांच्या निदर्शनास आणावा.
- विकिरणाचा धोका टाळण्यासाठी असलेली सर्व साधनसामग्री सुस्थितीत आहे याकडे त्यान लक्ष◌ा ठेवावे.
- रुग्ण शुल्क वसुल करणे, जमा करणे व हिशोब ठेवणे.
- राष्टीय कार्यक्रमात मदत व सहभाग घेणे.

अधिष्ठाता,

डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपूरी,नांदेड

माहिती अधिकार अधिनियम २००५

दंत तंत्रज्ञ - पदाचा जॉब चार्ट

- दंत तंत्रज्ञाने ८.३० ते दुपारी १२.३० पर्यत व संध्याकाळी २ ते ४.३० वाजेपर्यत हजर रहावे.
- निकडीच्या वेळेस आवश्यक असेल त्याप्रमाणे त्याने हजर रहावे.
- दंत विषयक अडचण असलेल्या रुग्णाला आवश्यक ते मार्गदर्शन करणे.
- दंत विषयक रुग्णावर उपचार करण्याकरीता वैद्यकीय अधिका-यांना मदत करणे.
- दातांच्या कवळी तयार करणे.
- वैद्यकीय अधिका-यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणे.
- विभाग प्रमुखांनी वेळोवेळी सोपविलेली विविध कामे पार पाडणे.
- दातांच्या आराग्य संदर्भात वैद्यकीय अधिका-यांना शिबीरे आयोजित करण्यात मदत करणे.
- विविध राष्टीय कार्यक्रमात सहभाग घेणे.यशस्वीतेकरीता मदत करणे.
- दंत रुग्णाची काळजी घेणे.
- दंत रुग्णांवर प्रथोमोपचार करणे.
- दंत विभागातील विविध साधनसामुग्रीची निगा राखणे, साफ सफाई राखणे.
- दंत विषयक विविध आकडेवारी ,माहितीच्या नोंदी अद्ययावत ठेवणे.
- विविध प्रकारची माहिती अध्यापकांना पुरविणे.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
विष्णुपूरी,नांदेड

माहिती अधिकार अधिनियम २००५

वाहन चालक - पदाचा जॉब चार्ट

- वाहन सुस्थितीत ठेवणे,ऑईल, पाणी,हवा,ब्रेक,लाईट इ.सर्व व्यवस्थित ठेवणे.
- वाहन दुरुस्ती केल्यानंतर हिस्टी शीट मध्ये त्यांच्या नोंदी घेणे व कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी घेणे.
- लॉग बुक अद्ययावत ठेवणे,नोंदी घेवून कार्यालय प्रमुखांच्या स्वाक्ष-या घेणे.
- इंधन देयके लॉग बुक मध्ये नोंदवून प्रमाणित करुन सादर करणे.
- २४ तास वाहन सुस्थितीत प्रवासाकरीता ठेवणे.
- वरिष्ठांच्या आदेशानुसार रुग्ण वाहिन्या व्यातिरिक्त राष्टीय कार्यक्रम व इतर निकडीच्या अत्यावश्यक वेळी वाहन चालविणे.
- वेळोवेळी वरिष्ठांच्या आदेशांप्रमाणे वाहन प्रवासास सुस्थितीत उपलब्ध करुन देणे.
- संस्थाप्रमुखांच्या विविध शासकीय भेटीसाठी तसेच व्ही.आय.पी.दौ-यासाठी वाहन घेऊन जाणे.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महा
विष्णुपूरी,नांदेड

माहिती अधिकार अधिनियम २००५

विजतंत्री – पदाचा जॉब चार्ट

- रुग्णालयातील विविध विभाग ,मुलामुलींचे वसतिगृह,निवासस्थाने,ओपीडी इमारत,इन्सीनेटर,बाहय रुग्ण विभाग वगैरे ठिकाणच्या विद्युत विषयक कामे करणे.
- विविध विभागातील लाईट ,पंखे व इतर विद्युत साहित्य सुस्थितीत चालू ठेवणे.
- रुग्णालयात आयाजित करण्यात आलेल्या विविध प्रसंगी विद्युतकरणाचे काम करणे.
- वैद्यकीय विद्यार्थ्यांकरीता आयाजित केलेल्या विविध शैक्षणिक ,मनोरंजनात्मक कार्यक्रमांच्या वेळी विद्युती करण करावे.
- विविध विभागातील विविध प्रकारची यंत्र सामुग्री सुस्थितीत चालू ठेवण्याची जबाबदारी असेल.
- वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या तक्रारीचे निवारण करणे.
- रुग्णालयाच्या सर्व विभागांमधील विद्युत उपकरणांविषयक अडीअडचणी सोडवाव्यात.
- वेळोवेळी वरीष्ठांनी सोपविलेली विविध कामे पार पाडावीत.
- रुग्णालयीन परीसर विद्युत रोषणाई आकर्षक दिसेल याची काळजी घेणे.
- रुग्णालयीन परीसर विद्युत रोषणाईने आल्हाददायक व प्रसन्न राहील याची काळजी घेणे.
- रुग्णालयाच्या परिसरातील पथदिव्यांची काळजी घ्यावी.
- विद्युत विभागाशी निगडीत अशा सर्व प्रकारच्या आवश्यक नोंदी वेळच्या वेळी घेऊन तद्संबंधी नोंदवहया अद्ययावत ठेवाव्यात.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
विष्णुपूरी,नांदेड

माहिती अधिकार अधिनियम २००५

सुतार - पदाचा जॉब चार्ट

- रुग्णालयातील विविध विभाग ,मुलामुलींचे वसतिगृह,निवासस्थाने,ओपीडी इमारत,इन्सीनेटर,बाहय रुग्ण विभाग वगैरे ठिकाणच्या सुतार विषयक कामे पाडावीत.
- विविध विभागातील लाकडी सामान व इतर लाकडी साहित्य सुस्थितीत ठेवावे.
- मुला-मुलींकरीता असलेले बेंचेस सुस्थितीत ठेवणे व ते दुरुस्त करणे.
- सर्व विभागातील दरवाजे,खिडक्या वगैरेंची निगा राखणे.
- रुग्णालयातील सर्व टेबल ,खुर्च्या ,बाक,स्टुल वगैरे लाकडी सामानांची निगा राखणे.
- विविध विभागात आवश्यकतेप्रमाणे काम करणे.
- वेळोवेळी वरीष्ठांनी सोपविलेल्या जबाबदा-या पार पाडणे.
- अथिव्यंगोपचार विभागातील रुग्णांसाठी कृत्रिम अवयव तयार करण्यात मदत करणे.

अधिष्ठाता,
डॉ .शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय, विष्णुपूरी,नांदेड

माहिती अधिकार अधिनियम २००५

औषधनिर्माता - पदाचा जॉब चार्ट

- रुग्णालयातील विविध बाहय रुग्ण विभागात स्त्री व पुरुष खिडक्यांवर औषध .वाटप करणे.
- मुख्य औषधभांडार विभागातून प्रत्येक कक्षात औषध वाटप करणे.
- औषध व औषध वितरणाचे लेखे व्यवस्थित ठेवणे.
- औषध वितरणाचे मासिक अहवाल तयार करणे.
- औषधांचे लेजर लेखे ठेवणे.
- वरीष्ठांनी वेळोवेळी सोपविलेल्या जबाबदा-या पार पाडणे.

अधिष्ठाता,
डॉ .शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय, विष्णुपूरी,नांदेड

माहिती अधिकार अधिनियम २००५

वरिष्ठ औषधनिर्माता - पदाचा जॉब चार्ट

- रुग्णालयातील विविध बाहय रुग्ण विभागात औषधनिर्मात्यांच्या पाळया लावणे व त्यावर नियंत्रण ठेवणे.
- मुख्य औषधभांडार विभागातून औषधांची मागणी करणे व त्यांचे लेखे ठेवणे.
- रुग्णालयातील विविध बाहय रुग्ण विभागात स्त्री व पुरुष खिडक्यांवरील औषध वाटपांवर नियंत्रण ठेवणे.
- औषध व औषध वितरणाचे लेखे तपासणे.
- औषध वितरणाचे मासिक अहवाल तयार करणे.
- औषधांचे लेजर लेखे ठेवणे.
- वरीष्ठांनी वेळोवेळी सोपविलेल्या जबाबदा-या पार पाडणे.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपूरी,नांदेड

माहिती अधिकार अधिनियम २००५

वैद्यकीय सामाजीक कार्यकर्ता व सामाजीक कार्यकर्ता - पदाचा जॉब चार्ट

- रुग्णालयात येण-या विविध रुग्णांना योग्य मार्गदर्शन करणे.
- अति गरीब रुग्णांना निधी उपलब्ध करुन देणे.
- शिबीर आयोजित करण्यास मदत करणे.
- दारिद्रय रेषेखालील रुग्णांना पडताळणी करुन औषधे उपलब्ध करुन देणे.

वर्ग ३ वैद्यकीय अधिकारी- पदाचा जॉब चार्ट

- रुग्णालयातील अतिदक्षता विभागात एम.एल.सी केसेस हाताळणे.
- वर्ग ३ पदाची वैद्यकीय तपासणी करणे.
- वैद्यकीय अधिक्षकांना रोजच्या कामात मदत करणे.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय, विष्णुपूरी,नांदेड

माहिती अधिकार अधिनियम २००५

आहारतज्ञ – पदाचा जॉब चार्ट

- रुग्णालयातील पाकशाळेतील आहाराचे निरिक्षण करणे.
- रुग्णांचा आहार निश्चित करणे.
- अन्न भांडार सुस्थितीत ठेवणे.
- न्युटीशन आहाराचे निरिक्षण व नियंत्रण करणे तसेच त्या संबधित योग्या ती प्रणाली तयार करणे.
- कक्षामध्ये आहार वितरण होण्या संबंधी भेट देणे.अधिसेविका यांच्या सोबत चर्चा करुन आहार वितरणाबाबत तक्रारी दूर करणे.
- अन्न पदार्थ देणगी मिळाल्यास त्याचे नेटके वितरण करणे.
- विविध आजारांच्या रुग्णांना त्यांच्या आजारा प्रमाणे आहार सांगणे.
- आहार वितरण नोंदवही अद्ययावत करणे.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय, विष्णुपूरी,नांदेड

माहिती अधिकार अधिनियम २००५

व्यवसायोपचारक व भौतीकोपचारक - पदाचा जॉब चार्ट

- रुग्णालयातील येणा-या रुग्णांची शारिरीक तपासणी ,इतर तपासण्या करुन रोगांवर योग्य व्यायाम देणे.
- रुग्णांना व्यायाम शिकवणे.
- रुग्णालयातील येणा-या रुग्णांची शारिरीक तपासण्यांचे लेखे अद्ययावत करणे व त्यांची देखभाल करणे.
- रुग्णांना योग्या सल्ला देणे व पुढील उपचारांसाठी मार्गदर्शन करणे.
- शारिरीक तपासणी च्या केसेस बैठकीसाठी व चर्चेसाठी सुसूत्रबध्द सादरीकरण करणे.
- रुग्णांचे शारिरीक निरिक्षण करणे तसेच विद्याथ्यांना व सहका-यांना शारिरीक शिक्षण देणे.
- प्राध्यापक व विभाग प्रमुखांनी वेळोवेळी नेमून दिलेली कामे करणे.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय
महाविद्यालय, विष्णुपूरी,नांदेड

माहिती अधिकार अधिनियम २००५

स्वच्छता निरीक्षक – पदाचा जॉब चार्ट

- रुग्णालय,महाविद्यालय,डॉक्टर्स क्वाटर्स येथील स्वच्छतेवर देखरेख ठेवणे.
- तृतीय व चतुर्थश्रेणी निवासस्थान आवार स्वच्छ ठेवण्याची सोय करणे.
- कचरा जाळण्याच्या मशीनवर देखरेख ठेवून रोजच्या रोज वापर करणे.
- वरचेवर कक्षात व रुग्णालयीन परिसरात राऊंड घेवून काही अडचणी असल्यास त्यांचे निरसन करणे.

माहिती अधिकार अधिनियम २००५

श्रवणोपचारक – पदाचा जॉब चार्ट

- मुक व बधिर रुग्णांची एकू येण्याची क्षमता तपासून त्याप्रमाणे त्यांना उपचार घेण्याचा सल्ला देणे.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महा
विष्णुपूरी,नांदेड

माहिती अधिकार अधिनियम २००५

दूरध्वनी चालक - पदाचा जॉब चार्ट

- बाहेरुन आलेले दूरध्वनी घेणे.
- प्रत्येक विभागात आलेले दूरध्वनी ताबडतोब त्या त्या विभागात देणे.
- तीन पाळीत २४ तास उत्तम सेवा देणे.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय
महा विष्णुपूरी,नांदेड

माहिती अधिकार अधिनियम २००५

वस्त्रपाल - पदाचा जॉब चार्ट

- कपडे व कापड आवश्यकता प्रमाणे पुरवठा करणेसाठी रुग्णालयातील रुग्ण व वर्ग ४ कर्मचारी यांची यादी तयार करणे.
- रुग्णांसाठी कपडे तयार करणे.
- वर्ग ४ कर्मचा-यांसाठी गणवेश तयार करणे.
- लेखा परिक्षणाच्या आक्षेपांचे निराकरण करणे.
- कपडयांची मागणी व धुलाई करिता धोब्यांना दिलेल्या कपडयांचे नोदवही,अभिलेखे अद्ययावत करणे.
- भांडारातील उपलब्ध मालाची तपासणी करणे.
- निर्लेखीत करवयाच्या केलेल्या साठयांची,मालांची नोंदवही अद्ययावत करणे.
- शिंपी व पिंजारी कर्मचा-यांच्या कामावर निरीक्षण व नियंत्रण ठेवणे.
- वर्ग ४ कर्मचा-यांसाठी गणवेश वाटप करणे.
- शिलाई यंत्राची तसेच त्यासाठी आवश्यक असणा-या मालाची खरेदी तसेच देखभाल व दुरुस्ती करणे.
- कक्षांमधील कापड ,कपडे यांची भांडार पडताळणी करणे.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महा
विष्णुपूरी,नांदेड

माहिती अधिकार अधिनियम २००५

शिंपी वर्ग ३ – पदाचा जॉब चार्ट

- वर्ग ४ कर्मचा-यांसाठी गणवेश तयार करणे.
- रुग्णांसाठी कपडे तयार करणे.
- रुग्णांचे फाटलेले कपडे शिवून देणे.
- शस्त्राक्रियागृहासाठी लागणारे मास्क,कॅप,ॲप्रन इ. शिवून देणे.
- शिलाई यंत्राची देखभाल करणे व यंत्रे सुस्थितीत ठेवणे.
- वस्त्रपाल यांनी सांगितलेली सर्व कामे करणे.

कृत्रिम अवयव तंत्रज्ञ – पदाचा जॉब चार्ट

- अपंग रुग्णांचे कृत्रिम हात,पाय व इतर अवयव बनवणे.
- वरीष्ठांनी वेळोवेळी सांगितलेली सर्व कामे करणे.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय
महा विष्णुपूरी,नांदेड

शुमेकर – पदाचा जॉब चार्ट

- अस्थिव्यंग रुग्णांचे शुज व चपला बनविणे.
- रुग्णांचे कॅलीपर पॅडींग करणे.
- वरीष्ठांनी वेळोवेळी सांगितलेली सर्व कामे करणे.

अर्थोटीक तंत्रज्ञ – पदाचा जॉब चार्ट

- अपंग रुग्णांचे कृत्रिम हात,पाय व इतर अवयव बनवणे.
- अपंग रुग्णांचे कॅलीपर बनवणे.
- वरीष्ठांनी वेळोवेळी सांगितलेली सर्व कामे करणे.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महा
विष्णुपूरी,नांदेड

अंध मॉलीशवाला – पदाचा जॉब चार्ट

- रुग्णांना डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणे मसाज करणे.

वैद्यकीय अभिलेख तंत्रज्ञ – पदाचा जॉब चार्ट

- रुग्णांच्या केसपेपरचे रेकॉर्ड ठेवणे.
- त्याबाबत रुग्णांच्या नोंदी रजिस्टरमध्ये ठेवणे.
- सर्व अभिलेखे वर्षनिहाय ठेवणे.
- अभिलेखे लवकर सापडण्याची दक्षता घेणे.
- अभिलेखे मागणीप्रमाणे त्वरित उपलब्ध करुन देणे.
- वरीष्ठांनी वेळोवेळी सांगितलेली सर्व कामे करणे.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय
महा विष्णुपूरी,नांदेड

अभिलेखापाल - पदाचा जॉब चार्ट

- हिमोडायलेसीस रुग्णांची सर्व माहिती नोंदवहीत नोंदविणे.
- नेफ्रॉलॉजी क्लिनीकमध्ये येणा-या जुन्या व नव्या रुग्णांची नोंद करणे.
- एच.डी.पी.डी पॅराटोनीस्कोपी ,सिस्टोस्कोपी ,किडणी,ए.व्हि.फ्रिस्टूला तसेच प्रयोगशाळेतील रक्ताच्या केलेल्या तपासण्यांच्या नोंदी ठेवणे.
- अभिलेखे मागणीप्रमाणे त्वरित उपलब्ध करुन देणे.
- वरीष्ठांनी वेळोवेळी सांगितलेली सर्व कामे करणे.

बाष्पक परिचर - पदाचा जॉब चार्ट

- स्टरलायजरची पाहाणी करण्यासाठी स्टरलायजर खोलीत हजर रहाणे.
- तात्रिक बिघाड झाल्यास त्वरित दुरुस्त करुन घेण्याची दक्षता घेणे.
- वरिष्ठांनी वेळोवेळी सांगितलेली सर्व कामे करणे.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय
महा विष्णुपूरी,नांदेड

जनरेटर ऑपरेटर - पदाचा जॉब चार्ट

- जनरेटर दररोज चालू करुन निरिक्षण करुन सुस्थितीत ठेवणे.
- बॅटरी व विद्युत पुरवठा चेक करणे.
- डिझेल पुरवठा नियमित ठेवणे.
- रेडियटर मधील पाणी चेक करणे व किरकोळ दुरुस्तीची कामे करणे.
- जनरेटर चाले असताना उपस्थित रहाणे.
- डिझेल व जनरेटर सेट ची दैनंदिन नोंदवही ठेवणे.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महा
विष्णुपूरी,नांदेड

क्ष किरण सहाय्यक - पदाचा जॉब चार्ट

- क्ष किरण सहाय्यकाने शासनाने ठरवून दिलेल्या वेळात हजर रहावे.निकडीच्या वेळेस आवश्यक असेल त्याप्रमाणे त्याने हजर राहावे.
- क्ष किरण तंत्रज्ञाने काढलेल्या क्ष किरणांना रसायनात धुणे व वाळवणे.
- क्ष किरण तंत्रज्ञाला रुग्णाचा क्ष किरण काढण्यास मदत करणे.
- प्राध्यापक व विभाग प्रमुखांनी वेळोवेळी सांपविलेली कामे पार पाडणे.
- त्याने दररोज नेहमीचे काम सुरु करण्यापूर्वी क्ष किरण यंत्र स्वच्छ करावे व ते नीट काम देत आहे हे पाहावे.
- त्याने यंत्राचे संधारण व दुरुस्त्या यांची नोंद दिनांकासह दर्शविणारी विशेष नोंदवही ठेवावी.
- त्याने वापरलेल्या क्ष किरण फिल्मचा दररोजचा हिशोब त्यांच्या निरनिराळया आकारानुसार ठेवावा.
- क्ष किरण यंत्राच्या कामकाजात कोणताही अडथळा येत असल्यास त्याने तो वेळेवर क्ष किरण वैद्यकीय अधिक्षकांच्या निदर्शनास आणावा.
- विकिरणाचा धोका टाळण्यासाठी असलेली सर्व साधनसामुग्री सुस्थितीत आहे याकडे लक्ष द्यावे.
- रुग्ण शुल्क वसुल करणे ,जमा करणे व हिशोब ठेवणे.
- राष्टीय कार्यक्रमात मदत व सहभाग घेणे.

अधिष्ठाता,

डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपूरी,नांदेड

सी टी स्कॅन तंत्रज्ञ - पदाचा जॉब चार्ट

- सी.टी.स्कॅन तंत्रज्ञाने २४ तास हजर रहावे.निकडीच्या वेळेस आवश्यक असेल त्याप्रमाणे त्यान हजर राहावे.
- त्याने दररोज नेहमीचे काम सुरु करण्यापूर्वी सी.टी.स्कॅन यंत्र स्वच्छ करावे व नीट काम देत आहे हे पाहावे.
- त्याच्या ताब्यातील सी.टी.स्कॅन यंत्राच्या परिक्षणासाठी व दुरुस्ती साठी तो जबाबदार असतो.
- त्याने यंत्राचे संधारण व दुरुस्त्या यांची नोंद दिनांकासह दर्शविणारी विशेष नोंदवही ठेवावी.
- सी.टी.स्कॅन विभागाची उप-विभागीय जड वस्तू नोंदवही व साप्ताहिक मागणीपत्रे यासाठी तो जबाबदार असतो.
- सी.टी.स्कॅन यंत्राच्या कामकाजात कोणताही अडथळा येत असल्यास त्याने तो वेळेवर सी.टी.स्कॅन विभाग प्रमुखांच्या निदर्शनास आणावा.
- राष्टीय कार्यक्रमात मदत व सहभाग घेणे.
- प्राध्यापक व विभाग प्रमुखांनी वेळोवेळी सांगितलेली कामे करणे.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
विष्णुपूरी,नांदेड

विद्युत वैद्यकीय तंत्रज्ञ - पदाचा जॉब चार्ट

- हृदयरोग विभागात अॅन्जोग्राफी मशीन ऑपरेट करणे.
- रुग्णांच्या चाचण्यांची नोंदवहीत नोंद घेणे.
- त्याने यंत्राचे संधारण व दुरुस्त्या यांची नोंद दिनांकासह दर्शविणारी विशेष नोंदवही ठेवावी.
- ब्लड गॅस मशीन ऑपरेट करणे.
- यंत्र सुस्थितीत आहे याची तपासणी करणे.
- राष्टीय कार्यक्रमात मदत व सहभाग घेणे.
- प्राध्यापक व विभाग प्रमुखांनी वेळोवेळी सांगितलेली कामे करणे.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
विष्णुपूरी,नांदेड

पाठयनिर्देशिका,चिकित्सालयीन निर्देशिका - पदाचा जॉब चार्ट

- अभ्यासक्रमात सर्व विषयांचे नियोजन व अंमलबजावणी करणे.
- वर्गपाठ व कक्षातील अनुभवांचा समन्वय साधून कक्षातील रुग्णांच्या निदानानुसार संपूर्णपणे परिचर्या उपचार शिकविणे.उदा.चिकित्सालयीन प्रात्यक्षीके ,परिसंवाद,केस प्रजेन्टेशन त्यानुसार परिक्षा इ.
- चिकित्सालयीन,पर्यवेक्षण व विद्यार्थ्यांना नर्सिग उपचारचा प्लॅन तयार करण्यास मदत करणे.
- विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व सल्ला वर्गामधील साहित्य आणि पुरवठा द्रृक श्राव्य ,साधने व त्याची देखभाल करणे.
- विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकियेमध्ये महत्वाचा सहभाग व महाराष्ट परिचर्या परिषदेच्या परिक्षांचे नियोजन व अंमलबजावणी करणे.
- ग्रंथालय चालविणे,पुस्तकांची उपलब्धता व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे.
- विद्यार्थ्यांच्या आराग्याची देखभाल ,नियोजन व अंमलबजावणी करणे.
- विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षण काळातील सर्व नोंदी अद्ययावत ठेवणे.
- विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यक्रमा व्यतिरिक्त इतर कार्यक्रमामध्ये सहभागासाठी मार्गदर्शन व सल्ला देणे.
- ग्रामीन प्रशिक्षण अनुभव वर्ग पाठ व प्रत्यक्ष अनुभव यांची सांगड घालणे. ग्रामीन प्रशिक्षण कालावधीत विद्यार्थ्यांच्या सोबत रहाणे व त्यांना प्रशिक्षण मार्गदर्शन व सल्ला देणे. त्या कालावधीत त्यांच्या आरोग्याची व आहाराची देखभाल करणे.
- प्रशिक्षण कालावधीत शैक्षणिक सहलींचे नियोजन व अंमलबजावणी करणे.
- प्राचार्य व उप प्राचार्य यांच्या गैरहजेरीत विद्यालयाचा कार्यभार पाहाणे

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, विष्णुपूरी,नांदेड

बालरुग्ण परिसेविका - पदाचा जॉब चार्ट

- अधिपरिचारीका प्रत्यक्ष रुग्णसेवा पुरवितात.परिचर्या सेवा आखणी (एन.जी.केअर प्लॅन) करणे जरुरी प्रमाणे रुग्णसेवा पुरविणे.
- जरुर पडल्यास स्वत: सेवा देणे,बालकांची सुरक्षितता ,आराम,स्वच्छता याकडे लक्ष देणे तसेच औषधोपचारांच्या नोंदी घेणे.
- आरोग्य शिक्षण इत्यादी पर्यवेक्षण व व्यवस्थापन कक्ष व परिसराची स्वच्छता ,कामाच्या वेळा ठरविणे व कामाचे वाटप करणे.
- विद्यार्थ्यासाठी चिकित्सालयीन अभ्यासाचे रुग्णसेवा , प्रात्यक्षिकाचे नियोजन व अंमलबजावणी करणे.

परिसेविका - पदाचा जॉब चार्ट

- प्रत्यक्ष रुग्णसेवा पुरविणे.
- कक्षातील सर्व व्यवस्थेचे नियोजन व अंमलबजावणी,तसेच पर्यवेक्षण करणे.
- विद्यार्थ्यासाठी चिकित्सालयीन अनुभवामध्ये साहित्य पुरवठा उपलब्ध करुन देणे व विद्यार्थ्यांचे पर्यवेक्षण करणे.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
विष्णुपूरी,नांदेड

अधिपरिचारीका - पदाचा जॉब चार्ट

- प्रत्यक्ष रुग्णसेवा देणे.ज्यामध्ये रुग्णांना औषोधोपचार देखरेख ,वैयक्तिक स्वच्छता,आहार,आराग्य शिक्षण देण्याची जबाबदारी असते.
- आवश्यक असणा-या परिचर्या कृती करणे.
- रुग्णांच्या विविध तपासण्या शल्यक्रिया व कृतीसाठी तयार करणे.
- रुग्णांचे दैनंदिन निरीक्षण व अहवाल व त्याप्रमाणे चिकित्सा करणे.
- कक्ष व्यवस्थापनात मदत करणे.
- विद्यार्थ्यांना शैक्षणीक अनुभव देण्यात सहभाग.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
विष्णुपूरी,नांदेड

गृह नि वस्त्रपाल - पदाचा जॉब चार्ट

- गृह-नि वस्त्रपाल हया परिसेविका व अधिसेविका यांना जबाबदार असतात.
- विद्यार्थीनी परिचसरीकांच्यासाठी गृह-नि वस्त्रपाल यांची आवश्यकता आहे.त्यांच्या वसतिगृहातील वास्तव्यात गृह नि वस्त्रपाल त्यांना सोई सुविधा व सुंरक्षीतता देतात.
- विद्यार्थीनीकडून वसतिगृहातील नियमांचे काटेकोरपणे पालन केले जाते याबाबत त्या दक्ष असतात.
- सकाळी व संध्याकाळी विद्यार्थीनीचा रोल कॉल घेणे.
- विद्यार्थीनीचे आरोग्य व वागणूकी संबंधी देखेरेख व व्यसस्था पाहाणे.
- अजारी विद्यार्थीनी वेळेवर हॉस्पीटल मध्ये नेणे डॉक्टरांचा सल्ला घेणे, आवश्यकतेनुसार कक्षात दाखल करणे.
- मेसमधील देखरेख, भोजन वाटप या संबंधी पाहणे.
- वस्तीगृहाची देखभाल ,इमारत मेन्टनंन्स ,विद्युतपुरवठा ,पी.डब्लू.डी इत्यादी कामे करुन घेणे.
- चतुर्थ श्रेणी कर्मचारी वर्गाकडून वसतिगृह परिसर तसेच वसतिगृहाची साफसफाई करुन घेणे.
- विद्यार्थीनीना लिनन पुरविणे व त्याची स्वच्छता करुन घेणे.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
विष्णुपूरी,नांदेड

शिपाई पदाचा जॉब चार्ट

- वेळोवेळी वरीष्ठांनी सोपविलेल्या विविध जबाबदा-या पार पाडणे.
- कार्यालयात साफसफाई करणे .
- टपाल वाटप करणे.
- देयके कोषागारात सादर करणे व संदेश वाहकाचे काम करणे.
- रोकड आणण्यासाठी रोखपाल यांचे सोबत कोषागारात जाणे.
- पार्सल सोडविणे.
- भांडार विभागास मदत करणे.
- वरिष्ठांनी सांगितलेली कामे करणे.
- राष्ट्रिय कार्यक्रमात सहभाग घेणे.
- लिपिकांना विविध प्रकारच्या नस्त्या सूचिबध्द करण्यासंदर्भात मदत करणे.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महा
विष्णुपूरी,नांदेड

प्रयोगशाळा सेवक – पदाचा जॉब चार्ट

- वेळोवेळी वरीष्ठांनी सोपविलेल्या विविध जबाबदा-या पार पाडणे.
- विभागातील प्रयोगशाळेत साफसफाई करणे
- विभागातील विविध प्रकारचे रसायणे व काच सामान यांची साफसफाई करुन निगा राखणे.
- विभागातील प्रयोगशाळेत वरिष्ठांना त्यांच्या मार्गदर्शनाखाली कामात मदत करणे.
- विभागाकरीता भांडारातून रसायने व काच सामान आणणे.
- विभाग प्रमुखांनी सोपविलेली कामे पार पाडणे
- विभागातील भांडार विभागास मदत करणे
- राष्ट्रिय कार्यक्रमात सहभाग घेणे

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महा
विष्णुपूरी,नांदेड

कक्षसेवक व चतुर्थश्रेणी सेवक पदाचा जॉबचार्ट

- रुग्णालयामधील कक्षामधील रुग्णांसंबंधीत स्वच्छतेची कामे
- रुग्णालयामधील कक्षामधील रुग्णांसंबंधीत स्वच्छतेची कामे
- रुग्णांकरीता पाकगृहामधून चहा, भोजन आणणे.
- रुग्णांना चहा, भोजन व औषध वाटपाकरीता सिस्टरांना मदतनीस म्हणून काम करणे.
- रुग्णांचे बेड तयार करणे.
- कक्षप्रमुख सांगितिल ती कामे पार पाडणे.
- राष्ट्रिय कार्यक्रमात सहभाग घेणे.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महा
विष्णुपूरी,नांदेड

आया- पदाचा जॉबचार्ट

- रुग्णालयामधील कक्षामधील रुग्णांसंबंधील स्वच्छतेची कामे करणे.
- रुग्णालयामध्ये दाखल होणा्-या स्त्री रुग्णांसंबंधातील प्रामख्याने कामे पार पाडणे.
- रुग्णांकरिता पाकगृहातून चहा, भोजन आणणे.
- रुग्णांना चहा, भोजन व औषध वाटपाकरिता सिस्टरांना मदतनीस म्हणून काम करणे.
- रुग्णांचे बेड तयार करणे.
- कक्षप्रमुख सांगतिल ती कामे पार पाडणे.
- राष्ट्रिय कार्यक्रमात सहभाग घेणे.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महा
विष्णुपूरी,नांदेड

क्ष किरण सेवक पदाचा जॉब

- क्ष किरण विभागामध्ये क्ष किरण यंत्राची ने आण करणे.
- क्ष किरण काढताना रुग्णांना व तंत्राज्ञांना मदत करणे.
- क्ष किरण विभागातील इतर कामे पार पाडणे.
- कक्षप्रमुख सांगतिल ती कामे पार पाडणे.
- राष्ट्रिय कार्यक्रमात सहभाग घेणे

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महा
विष्णुपूरी,नांदेड

सफाईगार पदाचा जॉब चार्ट

- महाविद्यालयातील सर्व विभागांतील सर्व कक्ष व विभाग व दर्शनीय भाग स्वच्छ करणे.
- रुग्णालय विभागांतील कक्षातील रुग्णांची लघवी , संडास साफ करणे.
- महाविद्यालयातील व रुग्णालयातील शौचालय, थुंकीपात्र स्वच्छ ठेवणे.
- नर्सिंग स्टाफला ग्लोव्हज मॅकेन्टोस स्वच्छ करुन देणे.
- रुग्णालयीन तपासणीची विशेष नमूने कक्षातून प्रयोगशाळेत घेऊन जाणे.
- महाविद्यालयातील व रुग्णालयातील जिने घासून पूसणे.
- महाविद्यालयातील व रुगणालयातील आवार स्वच्छ ठेवणे.
- महाविद्यालयातील व रुगणालयातील गटारी व ड्रेनेज स्वच्छ ठेवणे.
- वरिष्ठांनी सांगितलेली कामे करणे व सर्व राष्ट्रिय कार्यक्रमात सहभाग घेणे.
- दंत विद्यार्थ्यांच्या करीता असलेल्या वसतिगृहांची गटारी, ड्रेनेज, संडास, बाथरुम, जिने व विविध खोल्या यांची साफसफाई करणे.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महा
विष्णुपूरी,नांदेड

माळी पदाचा जॉब चार्ट

- महाविद्यालयातील सर्व विभागांतील सर्व कक्ष व विभाग व दर्शनीय भाग या ठिकाणचे गवत काढून झाडे लावणे.
- विविध विभागांतील झाडे, झुडपे व विविध शोभेची झाडे यांची निगा राखणे
- महाविद्यालय परिसरातील अनावश्यक गवत, झाडे, झुडपे यांचा नयनाट करणे.
- विविध विभागात आवश्यकतेप्रमाणे काम करणे.
- वेळोवेळी वरिष्ठांनी सांगितलेली विविध कामे करणे.
- महाविद्यालयाच्या परीसरात असलेल्या सर्व वृक्षांना पाणी घालणे.
- महाविद्यालयाच्या परिसरात विविध विभागांमध्ये आकर्षक बगीचा तयार करणे.
- महाविद्यालयाच्या परिसरात विविधि विभागांत व परिसरात वाढलेले अनावश्यक गवत कमी करणे.
- सर्व प्रकारच्या वृक्षांची काळजी घेणे.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महा
विष्णुपूरी,नांदेड

प्रमुख स्वयंपाकी पदाचा जॉब चार्ट

- रुग्णालयामध्ये दाखल होणा-या रुग्णांकरिता आहार तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली सकस आहार तयार करणे.
- स्वयंपाकी यांच्या मदतीने चहा, नाष्टा, भोजन तयार करणे.
- स्वयंपाकासंबंधिची कामे पार पाडणे. आहार तज्ञांना स्वयंपाकगृहातील किराण, धान्य भाजीपाला इ. बाबतची माहिती देणे.

स्वयंपाकी पदाचा जॉब चार्ट

- रुग्णालयामध्ये दाखल होणा-या रुग्णांकरिता आहार तज्ञांच्या र्मादर्शनाखाली सकस आहार तयार करण्याचे कामकाज स्वयंपाकगृहामध्ये चालते.
- प्रमुख स्वयंपाकी यांना चहा नाष्टा भोजन तयार करण्याच्या कामात मदत करणे.
- स्वयंपाकापूर्वीची आवश्यक ती कामे पार पाडणे.
- प्रमुख स्वयंपाकी यांना स्वयंपाकगृहातील किराणा धान्य भाजीपाला इ. बाबतची माहिती देणे.
- स्वंयपाकगृह प्रमुख सांगितिल ती कामे पार पाडणे.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महा
विष्णुपूरी,नांदेड

सहाय्यक स्वयंपाकी पदा**चा** जॉब चार्ट

- रुग्णालयामध्ये दाखल होणा-या रुग्णांकरिता आहार तज्ञांच्या र्मादर्शनाखाली सकस आहार तयार करण्याचे कामकाज स्वयंपाकगृहामध्ये चालते.
- प्रमुख स्वयंपाकी यांना चहा नाष्टा भोजन तयार करण्याच्या कामात मदत करणे.
- स्वयंपाकापूर्वीची आवश्यक ती कामे पार पाडणे.
- प्रमुख स्वयंपाकी यांना स्वयंपाकगृहातील किराणा धान्य भाजीपाला इ. बाबतची माहिती देणे.
- स्वंयपाकगृह प्रमुख सांगितिल ती कामे पार पाडणे.

अधिष्ठाता,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महा
विष्णुपूरी,नांदेड

स्वयंपाकी सेवक पदाचा जॉब चार्ट

- रुग्णालयामध्ये दाखल होणा-या रुग्णांकरिता आहार तज्ञांच्या र्मादर्शनाखाली सकस आहार तयार करण्याचे कामकाज स्वयंपाकगृहामध्ये चालते.
